MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात

**गेंड्याच्या कातडी पांघरलेल्या नरकेंना समज द्या!**

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२४१ | शुक्रवार दि.२४ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -241 | FRIDAY DT. 24 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# तलवाडा पोलीस ठाण्याचे प्रभारी सोमनाथ नरकेच्या काळात गोदामातेला नरक यातना कायमच!

## डीवायएसपी राजगुरू मांजर डोळे झाकून दूध पिते अशी गत तुमची झाली आहे?










- चकलांबा गेवराई तलवाडा तुमच्या हद्दीमध्ये येत नाही का
- डीवायएसपीच्या या हद्दीत काय काय चालतं हे दुनिया उघड्या डोळ्यांनी बघत आहे.?
- पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत वाळू उपशावर गोदावरी नदी पात्रात कारवाई करण्याची आदेश द्यावेत
- माजलगाव चे आयपीएस अधिकारी धीरजकुमार यांना चकलांबा आधी रेड मारण्यास जावं लागतं तर तलवाडा येथेही त्यांनी अवैध वाळू उपशावर कारवाई करावी एसपी नंदकुमार ठाकूर साहेब धीरज कुमार यांना आपण तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील वाळूमाफियांना अद्दल घडविण्यासाठी धीरज कुमार यांना आदेश द्याच?
- पोलीस स्टेशनचे विद्यमान प्रभारी एपीआय सोमनाथ नरके हे माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला असल्यापासून सोमनाथ नरकेच्या वाळू कलेक्शन जोरात जुने खातेदार जोमाने खात्यामध्ये निधी भरू लागले?
- एपीआय सोमनाथ नरके यांनी वेगवेगळ्या भांडणांमध्ये माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला काय दिवे लावले होते तपासामध्ये हे सर्वांना माहीत आहे माजलगाव ग्रामीण ला असल्या मुळे सोमनाथ नरकेला तलवाडा माजलगाव गेवराई गोदा पात्रातून जाणाऱ्या सर्व वाळू माफी यांचे जुने धागेद्वारे कामी येत आहेत?
- तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अनेक भांडण हाणामाऱ्या राजकीय कुरबड्यांमध्ये राजकीय नेत्यांना व गाव पातळीवरील नेत्यांना सोमनाथ नरकेंकडून पाठबळ?
- दारू पत्याचे क्लब मटका गुटका पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जोरात सुरु सोमनाथ नरकेचे पोलीस कर्मचारी वसुलीमध्ये गुंग?
- सोमनाथ नरके यांना बीड जिल्ह्यामध्ये परत कोणाच्या आशीर्वादाने बोलन गोदापात्रा जवळ पोलीस स्टेशन कोणी दिले हे नव्याने सांगण्याची गरज आहे का?
- तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेसुमार वाळू उपसा; पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष
- अवैध वाळू उपसा सुरू असताना, तलवाडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके हे गप्प का आहेत?

तलवाडा /प्रतिनिधी

तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अवैध वाळू वाहतुकीने पुन्हा डोके वर काढले आहे. त्यातून शासनाचा हजारो रुपयांचा महसुल बुडत आहे. या प्रकाराकडे तलवाडा पोलीसांचे व महसूल विभागाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. दररोज रात्री अपरात्री जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा करून टॅक्टर माध्यमातून त्याची वाहतूक केली जात आहे. मग तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके हे मुंग गिळून गप्प का आहेत. का वाळू माफियांविरूद्ध कारवाई करण्याची हिंमत होत नाही. असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दिवसाढवळ्या अवैध वाळू उपसा तसेच त्याची मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जात आहे. याकडे तलवाडा पोलीसांचे व महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने वाळूमाफियांचे मनोबल वाढले आहे. यामुळे ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. गेवराई तालुक्यात वाळूमाफियांनी अक्षरश: हैदोस घातला आहे. पोलीस प्रशासनाच्या तसेच महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून दिवसाढवळ्या या काळ्या सोन्याची लूट केली जात आहे. पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगावर वाहने घालण्यापासून ते तहसील कचेरीतून वाळूचे ट्रक पळविण्यापर्यंत वाळू माफियांची मजल गेलेली आहे. असे घटना घडत असताना देखील याप्रकरणी वाळू माफियांच्या विरोधात कठोर कारवाई का होत नाही असा संतप्त सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

पोलीस प्रशासन मात्र राजरोसपणे अवैध वाळू उपस्याला मूक संमती देत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. तलवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नदी पात्रातून ट्रॅक्टर, हायवाच्या साह्याने बेसुमार वाळू उपसा होत आहे. या बाबत पोलीस कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांपासून ते तहसीलदारपर्यंत अर्थपूर्ण तडजोड होत आहे. परिणामी अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे फोफावत असून प्रामुख्याने नदी पात्रात रात्रीच्यावेळी अशा प्रकारची अवैध वाळू उपसा होत असल्याचे नागरिकांतून उघड बोलले जात आहे. अवैध वाळू उपस्यावर तहसील प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तलवाडा पोलीस प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे अवैध ऊपसा करणारे मात्र आपले उखळ पांढरे करुन घेत आहेत.

तलवाडा पोलीस स्टेशनचे विद्यमान साहेब पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके हे पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण येथे असताना किती जणांच्या मुंड्या मोडलेले आहेत हे सर्व जनतेला माहित आहे.? सोमनाथ नरके यांचे प्रमोशन झाल्याच्या नंतर ते जालना जिल्ह्यामध्ये प्रमोशन वरती गेल्यानंतर सुद्धा बीड जालना हद्दीतून गेलेल्या दोन्ही जिल्ह्याला वरदान लाभलेली गोदावरी नदीच्या पात्राच्या अवतीभोवतीत फिरून गोदा पात्र रुग्णांमध्ये हा अधिकारी बाहेर असल्याची चर्चा होत आहे नरके म्हणजे पोलीस स्टेशन मध्ये येणाऱ्या लोकांसाठी नरक यातना समजला जाणारा अधिकारी आहे अशी प्रतिक्रिया तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील छोट्या छोट्या जाती धर्मातील व व्यावसायिक लोक नरकेच्या व नरके हा पोलीस अधिकारी असलेला व तरोडा पोलीस स्टेशनचा प्रभारी असलेला अधिकारी आहे परंतु सोमनाथ नरके यांचे पोलीस कर्मचारी सुद्धा फक्त आणि फक्त कलेक्शन वरती ता मारून गेवराई बीड मध्ये राहत असून फक्त ते कलेक्शन साठीच पोलीस स्टेशनला जात आहेत कारण जर खरं पाहिलं तर तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण किती गुन्हे आहेत व या गुन्ह्याची सर्व माहिती व तपास वेगवेगळ्या बीट अमलदारांकडे कोणते कोणते खाते वाटप केलेले आहेत. कोणते कलेक्शन कोणाकडे आहे हे सर्व माहिती एपिआय सोमनाथ नरके यांच्या डायरीमध्ये नक्कीच सापडेल नरकेचे फोन कॉल चेक करणे गरजेचे आहे.?

एपीआय सोमनाथ नरके यांनी कोणत्या नेत्याकडून बदलीसाठी लॉबिंग करत एसपी वरती दबाव आणला हे नरके यांच्या तोंडून स्वतः व नरके यांच्या जवळच्या बगलबच्चा असलेले आर्थिक तडजोळीमध्ये पुढे असलेले कर्मचारी हे तलवाडा पोलीस स्टेशनच्या प्रांगणामध्ये चर्चा करत असताना नरके साहेब यांनी एसपी वरती कशाप्रकारे दबाव आणून तालवडा पोलीस स्टेशन घेतलं हे सांगण्यात व बाता ठोकण्यात नरके व नरके यांची टीम सध्या माहीर आहे तर नरके यांच्या पोलीस स्टेशन समोरून अवैध वाळू उपसा करणारे हायवा ट्रक ट्रॅक्टर हे राजरोष नरकेच्या गाडीला आडवा करून नरकेची गाडी थांबवत हे वाळू माफिया निघून जातात परंतु सोमनाथ नरके हे काहीच का बोलत नसतील अशी चर्चा होत आहे?

कोणत्या मंत्र्यांच्या आशीर्वाद आहे. हे कळायला जनतेला आता सांगायची गरज नाही असं सोमनाथ नरके तलवाडा पोलीस स्टेशन हे सांगत आहेत. परंतु कोणताही मंत्री असला तरी हा बीड जिल्हा आहे या ठिकाणी बीड जिल्ह्यातील मंत्री असतील किंवा नेता असेल किंवा एखादा शासकीय कार्यालयातील मोठा अधिकारी असेल किंवा पोलीस प्रशासन जिल्हाधिकारी असेल याला बीडची जनता नक्की धडा शिकवते हे मात्र नक्की आहे.

यातीलच सोमनाथ नरके यांचा आर्थिक कलेक्शन करणाऱ्या त्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांची यादी पुढील अंकामध्ये आम्ही जाहीर करणार आहोत.

गेवराई पोलीस स्टेशन असेल चकलांबा पोलीस स्टेशन असेल किंवा तलवाडा पोलीस स्टेशन असेल या सर्वांची जबाबदारी व या भागांमध्ये दोन नंबर वरती जर छाप कोणाची असेल तर तो अधिकारी म्हणजे डीवायएसपी असलेले नीरज राजगुरू यांची जिम्मेदारी आहे .परंतु डी वाय एस पी राजगुरू हे या दोन नंबर आल्यावर वरती मटका दारू पत्ते गुटका क्लब सह आवेद धंद्यावाल्यांसाठी कर्दनका ठरण्याचे ऐवजी त्यांचे पालन हार ठरलेले आहेत नक्कीच डी वाय एस पी राजगुरू यांची गच नेमकी अशी झाली आहे की ज एक मन आहे की मांजर डोळे झाकून दूध पिते तर तिला वाटतं मला कोणी बघत नाही परंतु तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील नव्हे तर गेवराई तालुक्यातील सर्वच पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अवैद्य धंदे हे जोराने चालू असतानाच यावेळी नक्कीच ग्रामीण भागातून ऊसतोड मजूर असेल किंवा अन्य छोटा मोठ्या जातीतील माणूस असेल छोटा मोठा व्यापारी असेल याला या दोन नंबरच्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून धोका निर्माण झालेला आहे यातीलच प्रामुख्याने असलेली वाळू अवैध वाळूचा हा डीवायएसपी चा आशीर्वादाने चालतो का अशी चर्चा सध्या गेवराई तालुक्यामध्ये ऐकायला मिळत आहे डी वाय एस पी राजगुरू यांनी आज पर्यंत केलेल्या एकूण कारवायाची संख्या डीवायएसपी राजगुरू यांनी एक पत्रकार परिषद घेऊन जाहीर करावी म्हणजे त्यांनी केलेल्या गेवराई पोलीस स्टेशन अंतर्गत असेल तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत असेल किंवा चकलांबा पोलीस स्टेशन अंतर्गत असेल एकूण कारवाया किती केल्यावर डी वाय एस पी राजगुरू यांनी त्या कार्यावरती काय परिस्थिती होती व त्या कारवायांमध्ये त्यांचा सहभाग काय होता हेही स्पष्ट करणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय महामार्ग बनले मृत्युचे सापळे ; अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील भेगा

## अपघातात निमंत्रण ; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

बीड ख प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातुन जाणारे राष्ट्रीय महामार्ग वाहनचालकांच्या मृत्युचे सापळे बनले असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा दरम्यान येळंब घाट याठिकाणी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जागोजागी भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे चाक फसुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे यात अनेकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे तर काही जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावरील खड्डे ,तडे आणि भेगा अपघातास निमंत्रण देत आहे . संबंधित काम एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनीकडून करण्यात आले असुन सततच्या अपघातांमुळे राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचा सापळा बनला असुन जबाबदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे. पडलेल्या भेगांची थातुरमातुर दुरुस्ती न करता ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी याप्रकरणी

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे आणि जिल्हा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. संबंधित प्रकरणात जबाबदार कंत्राटदार व प्रशासकीय आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यकारी अभियंता मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी या मार्गाचे काम कालावधी पूर्ण होऊनही गेल्या ६ वर्षांपासून अद्याप रखडलेल्या अवस्थेत आहे. एकुण १७० किलोमीटर लांबी असलेल्या महामार्गाची एकुण किंमत ८७९ कोटी रुपये आहे.राष्ट्रीय महामार्ग विभागाने ठेकेदारांच्या हितासाठी सदर रस्त्याचे तीन टप्पे करून तिन वेगवेगळ्या कंपन्यांना काम दिलेले आहे. अर्धवट रस्ता, खड्डे आणि पुर्ण झालेल्या कामाच्या ठिकाणी पुन्हा खड्डे पडले आहेत.चुंबळी फाटा ते मांजरसुंभा १६६ कोटी रूपयांचे काम (एचसीपीएल) ; मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा ३९५ कोटी रूपयांचे काम (एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनी) आणि धायगुडा पिंपळा ते अहमदपूर ३१८ कोटी रूपयांचे काम ( सत्यसाईबाबा कंपनी लातुर) यांच्या मार्फत करण्यात येत आहे. बहुतांश कामे अंदाजपत्रकाला फाटा देऊन संथगतीने कामे केल्याने रखडलेल्या अवस्थेत आहेत. कामे पूर्ण होण्यापूर्वीच जागोजागी रस्ते उखडले आहेत, खड्डे,भेगा पडलेल्या आहेत.आणि दुरुस्तीची कामे थातुरमातुर करण्यात येत असुन पडलेल्या भेगा डांबर टाकून बुजवण्याचे प्रकार करण्यात येत आहेत. कंत्राटदार यांच्यावर राष्ट्रीय महाप्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन मेहेरबान असल्याने रस्त्यांची दुरावस्था झाली आहे.महामार्गाचे काम सुरू होऊन ६ वर्षांपेक्षा कालावधी लोटला असुन अद्याप काही ठिकाणी दोन रस्त्यांमधील दुभाजक,अपुर्णच आहे काही ठिकाणी पुलांचे तर बहुतांश ठिकाणी नाल्यांची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत तसेच सुरू कामाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक,बरीकेट्स लावण्यात आलेली नाहीत त्यामुळे अपघातांच्या घटनेत वाढ झाली आहे त्यामुळे कासवगतीने चालणारे काम एचपीएम कंपनीने तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मांजरसुंभा ते अंबेजोगाई राष्ट्रीय महामार्गावर कागदोपत्रीच वृक्षलागवड

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण आणि विस्तारीकरण करताना ४०-५० वर्षापुर्वीची वड,पिंपळ, कडुनिंब या वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. नियमानुसार तोडण्यात आलेल्या वृक्षाच्या ५ पट झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावणे बंधनकारक असताना मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीने सुरूवातीला काही ठिकाणी वृक्षलागवड केल्याचे नाटक फोटो सेशन करण्यापुरतेच केले परंतु त्याचे संगोपन करण्यात आले नसुन सध्या एकही झाड अस्तित्वात दिसत नाही.मात्र वृक्षलागवड, वृक्ष संगोपन आणि उन्हाळ्यात टँकरने पाणी दिल्याची बिले मात्र नियमित उचलण्यात आल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे याठिकाणी वृक्षांची लागवड आणि संगोपण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय समाज पक्ष विधानसभा स्वबळावर लढवणार , काशिनाथ नाना शेवते प्रदेशाध्यक्ष

बीड ख प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेवजी जानकर साहेब यांच्या आदेशानुसार जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करण्यात आली. येणाऱ्या विधानसभेसाठी ही बैठक महत्त्वपूर्ण झाली आताच लोकसभेची रणधुमाळी कुठेतरी थांबली असता पक्षाच्या वतीने राज्यातील सर्व जागा स्वबळावर लढण्याचा निर्धार प्रदेश कार्यकारणी यांनी घेतला आहे, बोलताना श्री काशिनाथ नाना शेवते प्रदेशाध्यक्ष श्री माऊली नाना सलगर मुख्य महासचिव श्री अजित पाटील पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष श्री अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष पक्ष जिल्हा परिषद पंचायत समिती व आमदारकी स्वबळावर लढणार आहे, यासाठी गाव तेथे शाखा




आणि घर तेथे कार्यकर्ता ही संकल्पना राबविण्यात येणार आहे, वनबूथ टेन युथ ही संकल्पना राबवून राष्ट्रीय समाज पक्ष सर्व ताकतीनिशी बीड जिल्ह्यातील विधानसभा लढणार आहे ,माननीय महादेवजी जानकर साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन असंख्य कार्यकर्ते राष्ट्रीय समाज पक्षासोबत काम करण्यास इच्छुक आहेत जानकर साहेबांनी त्यांच्या ३० ४० वर्षातील त्यागातून हा पक्ष निर्माण करून वंचित उपेक्षित लोकांना अपेक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी त्यांनी निर्धार केलेला आहे त्यामुळे इथून पुढे जिल्ह्यातील लोकांना माझा आव्हान आहे त्याच त्याच लोकांना पुन्हा पुन्हा निवडून देऊन आपण विकासापासून वंचित आहोत त्यामुळे आता कुठेतरी बदल करण्याची गरज आहे बदल करून राष्ट्रीय समाज पक्ष गोरगरिबांच्या मदतीला धावून जाऊन जिल्ह्यात क्रांती करू शकतो त्यामुळे जिल्ह्यातील मायबाप जनतेच्या आशीर्वाद आमच्यासारख्या सर्वसामान्यांच्या मुलांना दिला तर त्यांना सर्वसामान्याचे दुःखाची जाण असते आणि त्यामुळे विकास नक्की होईल काशीद कोचिंग क्लासेस च्या पुस्तकाचे प्रकाशन सर्व वरिष्ठांच्या हाताने करण्यात आले यावेळी उपस्थित.विष्णू दादा देवकते युवा मल्हार सेना . विक्रम बप्पा सोनसळे लोकसभा अध्यक्ष. परशुराम काशीद विद्यार्थी जिल्हाध्यक्ष. तुषार उंबरे युवक जिल्हाध्यक्ष. साईनाथ विग्रे, जिल्हा उपाध्यक्ष. प्रेम धायगुडे जिल्हा उपाध्यक्ष. माऊली मार्कड विधानसभा अध्यक्ष बीड .किरण डोळस जिल्हाध्यक्ष महिला . पाराजी मोठे ज्येष्ठ नेते. शिवराम शिरगिरे युवा नेते .भावले साहेब. बालाजी सातपुते तालुकाध्यक्ष गेवराई. शाम महानोर तालुका अध्यक्ष शिरूर .रतन भोंडवे तालुका अध्यक्ष पाटोदा. कल्पेश भोंडवे तालुका युवक अध्यक्ष .नितीन शिंदे कामगार कर्मचारी तालुकाध्यक्ष . संतोष शेजवळ युवा नेते .अमर वाघमोडे .अंकुश गवळी पत्रकार .अशोक हप्ते. कृष्णा धापसे .अविनाश काकडे. गेवराई शहराध्यक्ष सचिन हातागळे .खताळ विकास तालुका उपाध्यक्ष पाटोदा. उपळकर दादा. जाधव राजाराम.

# विजेच्या लंपडावाने गेवराईकर त्रस्त

गेवराई - प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील महावितरण चा कारभार रामभरोसे झाला असून गेवराई तालुक्यातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसापासून वीज सुरळीत मिळत नसल्यामुळे नागरिक शेतकरी वर्ग व सर्वसामान्य व्यक्ती हवालदिल झाला आहे तसेच महावितरण कार्यालय व कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर लागत नसल्यामुळे सर्वसामान्यांना एक प्रश्न पडला आहे की महावितरण नेमकं काय चालले आहे महावितरण चा सर्व कारभार खाजगी कर्मचाऱ्यांच्या हातात असून त्यांना वरिष्ठांचे पाठबळ मिळत आहे का ? गेवराई शहरातील छोटे मोठे व्यवसायिक अर्थात आईस्क्रीम पार्लर रसवंती ग्रह छोटे मोठे हॉटेल व्यवसायिक यांना सतत होत असलेल्या वीज जाण्यामुळे या सर्व लोकांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे जर हे महावितरण ने थांबवली नाही तर या सर्व व्यवसायिकावर उपासमारीची वेळ येऊ शकते ग्रामीण भागातील सर्व शेतकरी बांधवांचा सतत जात असलेल्या लाईट मुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे त्यामुळे गेवराई तालुक्यातील सर्व शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे तसेच बीपी दमा शुगर स्किनचे प्रॉब्लेमचे असलेल्या व्यक्तींचे बीड जिल्ह्यातील वाढत्या



तापमानामुळे व महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे जगणे मुश्किल झाले आहे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तात्काळ दखल देऊन सतत होत असलेला वीज खंडित सुरळीत करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा अन्यथा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीन महावितरण कार्यालयावर संविधानिक मार्गाने मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड आप्पासाहेब मस्के लक्ष्मण उमाप खाजाभाई शेख भिवा हातागळे किरण कांडेकर गणेश दिवाण युसुफ शेख मिर्झा इराणी हानिफ शेख इत्यादी पदाधिकाऱ्यांनी केले आहे

# धाकट्या अलंकापुरीत हरिची कथा हराच्या दरबारी प्रारंभ !

महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे मधाळ वाणीतून सात दिवस भागवत कथा !

शिरूर कासार ख प्रतिनिधी

येथील धाकटी अलंकापुरी सिध्देश्वर संस्थानवर मंगळवारपासून महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे मधाळ वाणीतून भागवत कथा प्रारंभ झाली असुन हरिची कथा हराच्या दरबारी ग्रामस्थ व समस्थ महिला हरिपाठ मंडळाने आयोजीत केली असुन हे तिसरे वर्ष आहे .सिध्देश्वर संस्थानवर गेली दोन वर्षापासून कथा संपन्न झाली याही वर्षी कथेचे पुन्हा आयोजन करून भाविकांना कथा श्रवणाचा लाभ मिळणार आहे ,संगित साज व पात्र सजावटीने कथेचा आनंद द्विगुणीत होणार आहे .मंगळवारी पांच वाजता शहरातून



सवाद्य ग्रंथ दिंडी काढली गेली कथा स्थानी व्यास पुजन व ग्रंथपुजन करून कथेलाप्रारंभ झाला . पहिल्या दिवशी भागवत कथेचे महात्म्य सांगत असतांना कथा मुनी शुकदेवांनी राजा परिक्षितीला सांगितली त्याचे फळ राजाला काय मिळाले याबाबत सविस्तर निरूपण केले गेले .बुधवारी शुकदेव परिक्षीती चरित्र व संवाद , गुरूवारी कपील उपाख्यान ,नरसिह अवतार विदूर चरित्र कथन ,वामनअवतार जडभरत राजा चरित्र ,गजेंद्र मोक्ष व रामसिता पुजन सोहळा शुक्रवारी , कालियामर्दन ,गोवर्धन पूजा ,रूखमिनी स्वयंवर शनीवारी तर रविवारी महा रासलिला व सुदामा चरित्रातून मैत्री कशी असावी हा भाव सांगितला जाणार आहे सोमवरदिवशी दत्त अवतार ,परिक्षीती उध्दाराने कथेचा समारोप मंगळवारी महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे सकाळी दहा ते बारा या वेळेत काल्याचे किर्तन व नंतर उपस्थित भाविकांना अशोक सिताराम गायकवाड हे महाप्रसाद देणार आहेत .


निगमकल्पतरूच्या फळाचा रसस्वाद चाखण्यासाठी मोठ्या संखेने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक महिला मंडळ व ग्रामस्थांनी केले आहे .

# खळबळजनक! शेतजमिनीच्या वादातून झालेल्या तुंबळ हाणामारीत चुलत भावाचा मृत्यू

## गेवराई तालुक्यातील मानमोडी येथील खळबळजनक घटना

**गेवराई ख प्रतिनिधी**

**गेवराई : शेतजमीनीच्या वादातून सख्ख्या चुलत भावात वाद झाला. वादाचे रूपांतर तुंबळ हाणामारीत झाले. या तुंबळ हाणामारीत गंभीररीत्या झालेल्या एकाचा मृत्यू झाला आहे. ही खळबळजनक घटना गेवराई तालुक्यातील मानमोडी शिवारात गुरुवार (दि.२३) रोजी सकाळी घडली आहे. या घटनेनं परिसरासह तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. बापुराव रंगनाथ शेळमकर (वय ३५) असे मयताचे नाव आहे.**



गेवराई तालुक्यातील मानमोडी येथील रंगनाथ शेळमकर आणि भुजंग शेळमकर या दोघा भावांमध्ये शेतीच्या बांधावरून सतत वाद होत होते. सदरील वाद गावात बैठका घेवून सरपंच व गावातील नागरिकांनी मिटवण्यासाठी बैठक टाकली होती. परंतु यामध्ये देखील तोडगा न निघाल्याने त्यांच्यामध्ये बांधावरून सतत वाद होतच राहिले. सदरील ती शेत जमीनही बांधामुळे काही वर्षे पडीक ठेवण्यात आली होती. गुरुवारी वडील मंडळीचा वाद त्यांच्या मुलांमध्ये सुरू झाला होता. शेतात बाचाबाची झाल्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यात भुजंग शेळमकर, तिर्थराज शेळमकर, उद्धव शेळमकर यांच्यासोबत बापुराव शेळमकर यांची तुंबळ हाणामारी झाली. यात ते गंभीररीत्या जखमी झाले होते. त्यांना ताबडतोब वैद्यकीय उपचारासाठी बीड येथे दाखल करण्यात आले होते. परंतु त्यांना डॉक्टरांनी मयत घोषित केले. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.




# सामान्यांचा नवाब सुनिल काका पुस्तकाचे प्रकाशन

अंबाजोगाई -वेदश्री प्रकाशन संस्थेच्या वतीने सामान्यांचा नवाब सुनिल काका या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा गुरुवारी संपन्न झाला. वेदश्री प्रकाशन प्रकाशित सामान्यांचा नवाब सुनिल काका या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी दाजीसाहेब लोमटे होते निवृत्त न्यायमूर्ती वसंत पाटील यांच्या शुभहस्ते तर माजी विधान परिषद सदस्य संजय दौंड,विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक,राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सतिश पत्की,ज्येष्ठ कवयित्री विमल माळी,बबन लोमटे,ड.शोभा लोमटे आदी मान्यवर उपस्थित होते.

अंबाजोगाईकरांचे लाडके व्यक्तिमत्त्व सुनिल लोमटे यांचे गतवर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्याविषयी अनेकांच्या मनात मोठा आदरभाव होता व तो आजही कायम आहे. या लोकनेतृत्वाने जन सामान्यांची केलेली कामे स्मरणात राहतील असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले. यावेळी क्रिकेट खेळाडूंचा गौरव करण्यात



आला. प्रास्तविक ड.शोभा लोमटे यांनी केले संचालन प्रकाश बोरगांवकर यांनी व आभार ऋषिकेश लोमटे यांनी मानले. यावेळी विविध स्तरातील महिला,नागरिक, लोमटे परिवारातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सुनिल लोमटे सामाजिक प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतले.

# गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या तब्येतीची धनंजय मुंडे यांच्याकडून विचारपूस

## महाराजांच्या प्रकृतीत सुधारणा; युवक नेते अजय मुंडे यांनी पुण्याच्या रुग्णालयात जाऊन महाजारांची घेतली प्रत्यक्ष भेट

पुणे – श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री यांचा दोन दिवसांपूर्वी अपघात झाला असून ते सध्या पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचार घेत आहेत. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज महाराजांशी व रुग्णालयातील डॉक्टरांशी दूरध्वनीवरून चर्चा करून महाराजांच्या तब्येतीची विचारपूस केली. मुंडे कुटुंबीयांच्या वतीने आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते अजय मुंडे यांनी ह भ प विठ्ठल महाराज यांची पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे भेट घेऊन त्यांच्या तब्येतीबद्दल माहिती घेतली.

महाराजांच्या एका पायाला दुखापत झाली असून त्यांच्या प्रकृतीत आता सुधारणा होत आहे, अशी माहिती अजय मुंडे यांना डॉक्टरांनी दिली. दरम्यान राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी देखील यावेळी महाराजांशी दूरध्वनीवरून चर्चा करत महाराजांच्या तब्येतीची तसेच त्यांच्यावर सुरू असलेल्या उपचारांची माहिती घेतली व विठ्ठल महाराजांना लवकर आराम मिळावा अशी सदिच्छा व्यक्त केली. धनंजय मुंडे व त्यांची यंत्रणा विठ्ठल महाराज शास्त्री यांचा अपघात झाल्यापासून महाराजांच्या संपर्कात असून त्यांच्यावर सध्या पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचार केले जात आहेत, तसेच त्यांच्या प्रकृतीत आता सुधारणा होत आहे.





नाळवंडी । प्रतिनिधी

विश्वाला,शांतीचा,करुणेचा,मैत्रीचा,संदेश देणारे महाकारूनिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंती निम्मित मौजे शिवणी येथे आयोजित प्रियदर्शी धम्मसंस्कार संस्था बीड च्या वतीने प्रियदर्शी धम्मसंस्कार संस्थेचे सचिव भिख्खू धम्मशीलथेरो यांच्या नेतृत्वाखाली या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,या रक्तदान शिबिरामध्ये तब्बल ५० पेक्षा अधिक रक्तदात्याने आपले रक्तदान केले,या वेळी जीवनदायी ब्लड बँक बीड च्या सह्यतेने हा कॅम्प राबवण्यात आला होता,,आपल्या रक्ताने कुणाचा तरी जीव वाचू शकतो,रक्त दान हेच सर्वात श्रेष्ठ दान आहे,अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते.अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही, त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.त्यामुळे या शिबिरामधील रक्तदात्यांचे आयोजकाकडून व तसेच जीवनदायी ब्लड सेंटर कडून आभार व्यक्त करण्यात आले.



इंदापूर तालुक्यातील निमसाखर व निरवागी येथे दिनांक २३ ४ २००२४ रोजी रात्री आठच्या सुमारास वादळीवाऱ्यासह पाऊस झाला आहे त्यामुळे निरवागी येथील रासकर मळा येथे दळीबाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच निमसाखर येथे झाडे पडली आहेत निमसाखर ते विर वस्ती ला जाणार रस्ता झाड पडल्यामुळे वाहतूक बंध झाली आहे तसेच निमसाखर येथे शेवगा ची झाडे लावली अर्धा एकर झाडे पडली आहेत तुटायला आलेला शेवग्याचे नुकसान झाले आहे

# शिवाजी नगर येथील बलभिम नगर बुद्ध विहार संघर्ष समिति व महीला मंडळाकडून वैशाख पौर्णिमा व बुद्ध जयंती उत्साहात साजरी


प्रतिनिधी (बीड)

दिनांक २३/०५/२४ गुरुवार रोजी सकाळी १०:०० वाजता बलभीम नगर बुद्ध विहार पालवन रोड बीड या ठिकाणी वैशाख पौर्णिमाव बुद्ध जयंती निमित्त पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण नगरसेवक विनोद मुळुक यांच्या हस्ते करण्यात आले व विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिसरण पंचशील बुद्ध पूजा पाठ करण्यात आले त्या वेळी अंजली तेजस वडमारे, सरिता खेमाडे ,वनिता अंकुटे स्वाती वडमारे ,आचल वडमारे हेमा वडमारे जयश्री वडमारे अंकिता वडमारे ,अंजली वडमारे, वर्षा खेमाडे, शिवकन्या खेमाडे, आशा धनवे ,आदिती धनवे हर्षदा साळवे,राणी साळवे, नंदिनी साळवे, शकुंतला ससाने मॅडम, अर्चना जाधव हौसाबाई वाघमारे



निवृत्ती वाघमारे ऍड तेजस वडमारे, सिद्धार्थ वडमारे ,सचिन वाघमारे व शिवाजी नगर बलभीम नगर, दिलीप नगर, मित्र नगर सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांनी सहपरिवार पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून बलभीम नगर बुद्ध विहार या ठिकाणी बुद्ध जयंती च्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते

# परशुराम नानासाहेब वाघ गुरुजींचे दु:खद निधन....!



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील खडकी घाट येथील परशुराम नानासाहेब वाघ गुरुजी यांचे काल २० मे २०२४ रोजी सायंकाळी साडेनऊ वाजता बीड येथे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. आज सकाळी नऊ वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान येथील स्मशानभूमी मध्ये त्यांचे वर अंतिम संस्कार करण्यात आले. परशुराम नानासाहेब वाघ गुरुजी यांचे मृत्यू समयी ९१ वर्षे होते. पाठीमागे दोन मुलं सुना नातवंड असा मोठा परिवार बीड मुक्कामी आहे. ते भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या बहिणीचे सासरे होते. शिक्षक नोकरीमुळे बीड तालुक्यात अनेक ठिकाणी त्यांनी नोकरी केली होती. अत्यंत मनमिळावू आणि प्रामाणिकपणे शिक्षण सेवेचे काम त्यांनी केले. मोठा मित्रपरिवार त्यांच्या पाठीशी होता. आज अंत्यसंस्कार वेळी परिसरातील, मित्र परिवारातील अनेक जण उपस्थित होते.

# कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाची इयत्ता बारावी परीक्षेच्या निकालाची परंपरा कायम

शिरूर कासार ।प्रतिनीधी

आदर्श शिक्षण संस्था बीड ,संचलित कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२४ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली असून शिरूर तालुक्यातून तिन्ही शाखेत निकालाचा उच्चांक प्राप्त केला आहे.म.रा.उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या वतीने फेब्रु/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये विज्ञान शाखेचा १००% टक्के निकाल लागला, व कला शाखेचा ८५.८२% टक्के निकाल,तर वाणिज्य शाखेचा ९७.३६% टक्के निकाल लागला आहे. असा एकूण कनिष्ठ महाविद्यालयाचा सरासरी निकाल ९५.८९% लागला आहे.या मध्ये विज्ञान शाखेत विशेष प्राविण्य मिळविणारे १८२ विद्यार्थी आहेत व प्रथम श्रेणीत ११३ विद्यार्थ्यी आहेत तर ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण आहेत.तसेच कला शाख्येत विशेष प्राविण्यासह २० विद्यार्थी आहेत, प्रथम श्रेणीत ६२ विद्यार्थी आहेत तर द्वितीय श्रेणीत २७ विद्यार्थी उत्तीर्ण आहेत.तसेच वाणिज्य शाख्येत ०१ विद्यार्थ्याने विशेष प्राविण्य मिळविले व २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तसेच विज्ञान शाखेतून कु.ज्ञानेश्वरी चंद्रहास घोळवे हीने ९२.८३% घेऊन प्रथम क्रमांक पटकवला व कु.सुप्रिया तात्यासाहेब खोले ९०.१७% घेऊन द्वितीय क्रमांक तर कु.संस्कृती अशोक गव्हाणे हिने ८९.६७% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. तसेच कला शाखेतून कु.भाग्यश्री आबासाहेब महारनोर हिने ८१.६७%घेऊन प्रथम क्रमांक पटकावला व चि.अजिनाथ भारत गव्हाणे याने ८०.६७% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर चि.अविनाश अशोक औसरमल याने ८०.१७% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.आणि वाणिज्य शाखेतून कु.प्रांजली अनिलकुमार बोरा हिने ७७.५०% घेऊन प्रथम क्रमांक पटकवला व कु.तेजस्विनी परसराम मोरे हिने ६९.८३% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर कु.दिक्षा संतोष इंगळे हिने ६९.००% घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.अशी माहिती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अप्पासाहेब येवले यांनी दिली.तेव्हा कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयातील कला,विज्ञान व वाणिज्य शाखेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे, आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर संस्थेचे प्रशासक डॉ.राजु मचाले साहेब,रोहीत भैया क्षीरसागर



,कार्यवाहक एम.ए.राऊत,विद्यालयाचे प्राचार्य,अप्पासाहेब येवले ,उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक रमेश खोले विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,प्रा.नारायण घोलप,प्रा.अनिल जरे,प्रा.प्रशांत मळेकर,प्रा.महारूद्र डोंगरे प्रा.शशिकांत जावळे,प्रा.विनोद गलांडे,सांस्कृतिक प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे,अध्यापनाचे अतिशय महत्त्वाचे कार्य पार पाडणारे सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# उर समाज बहुधा लोकशाहीच्या प्रक्रियेत खुल्या आणि समान लिंग सहभागावर प्रतिबंध घालतो

जरी भारतीय राज्यघटनेने प्रजासत्ताकच्या पहाटे महिलांना समान मताधिकार प्रदान केले होते. परंतु यामुळे काही प्रमाणात आमूलाग्र बदल होत आहे

महिला साक्षरतेचा वाढता दर, पंचायती राज स्तरावर स्त्री-पुरुष समानतेला दिलेली मोठी जागा, बचत गटांची चळवळ आणि अलीकडच्या काही वर्षांत, मोबाईल क्रांतीमुळे माहितीची वाढती उपलब्धता. त्यामुळे गेल्या दशकभरातील निवडणूक प्रक्रियेतील महिलांचा सहभाग खरोखरच ऐतिहासिक असा डेटा देत आहे. २०१९ मध्ये, प्रथमच राष्ट्रीय निवडणुकांमध्ये, पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांच्या जास्त टक्केवारीने मतदानाचा हक्क बजावला - ४३८.५ दशलक्ष नोंदणीकृत महिला मतदारांपैकी ६७.१८ टक्के, पुरुषांच्या तुलनेत केवळ ६७.०२ टक्के. हे ०.१६ टक्के गुणांचे एक लहान अंतर होते, परंतु स्त्रीजातीसाठी एक मोठी झेप होती. उलगडत जाणारा क्रांतिकारी बदल सांख्यिकी प्रकट करतात-

जमिनीवर आहे. राष्ट्रीय ते राज्य निवडणुकांकडे लक्ष द्या आणि तुम्हाला दिसेल की सहभागी होण्याची मोठी इच्छा ही विकृती नसून सातत्यपूर्ण प्रवृत्ती आहे. २०२३ पर्यंतच्या पाच वर्षात निवडणुका झालेल्या २३ प्रमुख राज्यांपैकी तब्बल १८ राज्यांमध्ये महिलांचे मतदान जास्त होते. आमच्या मतदारांचे लिंग गुणोत्तर किंवा नोंदणीकृत मतदारांमध्ये १,००० पुरुषांमागे महिलांचे प्रमाणही वेगाने पुढे जात आहे. समतल खेळाचे क्षेत्र: या निवडणुकीत महिला मतदारांमध्ये ७.५ टक्के वाढ झाली असून, त्यांची एकूण संख्या आता ४७१.५ दशलक्ष झाली आहे. नोंदणीकृत पुरुष मतदार फक्त पाच टक्क्यांनी वाढून ४९७.२ दशलक्ष झाले आहेत. यासह, एकूण मतदार लिंग गुणोत्तर २०१९ मधील ९२६:१,००० वरून या निवडणुकीत ९४८:१,००० पर्यंत सुधारले आहे. त्यात ८.५ दशलक्ष प्रथमच महिला मतदारांचा समावेश आहे (ज्यांनी मतदान करण्याचे वय गाठले आहे). भारतीय महिला स्पष्टपणे देशाच्या राजकीय नशिबाच्या समान मध्यस्थ बनत आहेत. सुकन्या गांगुली, ३१, आयटी सल्लागार कोलकाता, संपूर्ण समाजासाठी बोलू शकते जेव्हा ती म्हणते, मला देश अधिक चांगला, समान आणि स्त्रियांसाठी राहण्यासाठी न्याय्य जागा बनवायचा असेल तर मला मतदान केले पाहिजे.

मताधिकारातील या मोठ्या वाट्याचा निवडणुकीच्या निकालांवर सहज परिणाम झाला आहे. किंबहुना, भारतीय राजकारणावर नरेंद्र मोदी सरकारचे दशकभराचे वर्चस्व काही प्रमाणात महिलांच्या मतदानाच्या पसंतीस कारणीभूत आहे. २०१४ मध्ये मोदी केंद्रस्थानी आले तेव्हापासून हा एक मूर्त ट्रेंड होता. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत, -ळी-चू खपवळर या पोलिंग एजन्सीच्या मतदानाच्या पद्धतींच्या विश्लेषणानुसार, पुरुषांच्या केवळ ४४ टक्के तुलनेत तब्बल ४६ टक्के महिला मतदारांनी भाजपला निवडले. ही कौतुकाची एकेरी वाहतूक नव्हती. मोदी सरकारच्या केंद्रीय योजनांमध्ये महिलांचा मोठा वाटा असल्याचे एसबीआय संशोधनातील आकडेवारीवरून दिसून येते. सर्व चणऊठ-कर्जामध्ये त्यांचा वाटा ६८ टक्के इतका आहे. चणऊठ- चे संक्षिप्त रूप त्याच्या पूर्ण फॉर्ममध्ये विस्तारित करा-चळली णपळीी ऊर्शींशश्रे-ाशपीं ठशषळपरपलश -सशपलू- आणि तुम्हाला माहिती आहे की अर्थव्यवस्थेच्या कोणत्या क्षेत्राला फायदा होत आहे. बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती सूक्ष्म-उद्योग विश्वात स्त्रिया कोणत्या प्रकारची सर्जनशील भूमिका बजावत आहेत आणि राजकारण अर्थशास्त्राशी कसे जोडले गेले आहे हे देखील ते आपल्याला सांगते. त्याचप्रमाणे, स्टँड-अप इंडियाच्या ८१ टक्क्यांहून अधिक फूटप्रिंट महिला आहेत.

राजकीय स्पेक्ट्रममधील महिलांशी जुळवून घेतलेली धोरणे मतदारांचा हा एक जास्त मागणी असलेला भाग असल्याचा ठोस पुरावा देतात. महिलांच्या मतांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेस स्वतःच्या हमीभावाची लढाई लढवत आहे. 'नारी न्याय' किंवा 'न्याय २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यातील पाच घटकांपैकी एक घटक महिलांसाठी आहे. त्याअंतर्गत दोन मोठी आश्वासने उभी आहेत. प्रथम, महालक्ष्मी योजनेंतर्गत प्रत्येक गरीब कुटुंबातील ज्येष्ठ महिलेच्या बँक खात्यात मासिक हप्त्यांमध्ये भरलेले वार्षिक रु १ लाख रोख हस्तांतरण. दुसरे, केंद्र सरकारच्या सर्व नोकऱ्यांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण. स्पष्टपणे, ग्रँड ओल्ड पार्टीला याची जाणीव आहे की त्यांच्या हक्काच्या नेतृत्वाखालील मोहिमेमुळेच त्यांना गेल्या वर्षी कर्नाटक आणि तेलंगणा जिंकण्यात मदत झाली. त्यात महिलांसाठी मोफत बस तिकीट यासारख्या साध्या सुविधांचा समावेश होता.

हे बिहारचे मुख्यमंत्री टी तेर नितीश कुमार यांच्या कल्याणकारी मार्गाची आठवण करून देणारे आहे, ज्यांनी २००० च्या मध्यात ८ वी उत्तीर्ण झालेल्या महिला विद्यार्थिनींना सायकल खरेदी करण्यासाठी पैसे देऊ करून अशा प्रकारच्या आउटरीचचे उद्घाटन केले होते. ही एक योजना होती. ज्याचे अनुकरण इतर अनेक राज्यांनी केले. त्या प्राथमिक गतिशीलतेपासून, भारत वेगाने आर्थिक गतिशीलतेच्या पुढील टप्प्यावर पोहोचत आहे. लिंग पोहोचण्याच्या या पैलूमध्येही राज्य सरकारांनी अनेकदा पुढाकार घेतला आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रचंड लोकप्रिय लाडली बहना योजनेने त्यांच्या राज्यातील गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळच्या भाजपच्या जाहीरनाम्यातील 'मोदी की हमी'मध्ये ३० दशलक्ष ग्रामीण महिलांना लखपती दीदी बनण्यासाठी सक्षम बनवण्याच्या मोठ्या योजनेचा समावेश आहे.

कार्यकारी संपादक मनीषा सरूप आणि वरिष्ठ सहयोगी संपादक जुमाना शाह या आठवड्यात आमच्या कव्हर स्टोरीसाठी चालू असलेल्या निवडणुकीचे लिंग ऑडिट करतात. इंडिया टुडेच्या प्रतिनिधींनी देशभरातील महिलांशी-तरुण आणि वृद्ध, ग्रामीण आणि शहरी, नोकरदार महिला आणि गृहिणी यांच्याशी त्यांना काय हवे आहे हे शोधून काढले. आणि त्यांनी हे शोधून काढले की महिलांना योजनेनंतर योजनांपेक्षा अधिक हवे असते. ब्रेड आणि बटरच्या समस्या त्यांच्यासाठी तितक्याच महत्त्वाच्या आहेत जितक्या ते पुरुषांवर परिणाम करतात. शिक्षण आणि रोजगाराचा अभाव ही त्यांच्या संभाषणात वारंवार येणारी थीम आणि चुटकीसरशी आहे

उच्च किंमती देखील महत्त्वाच्या आहेत. मतदारांच्या मतदानातील लैंगिक तफावत कमी होणे हे स्वागतार्ह लक्षण असले तरी इतर सर्व गोष्टींमधील लिंग अंतर हे एक विदारक वास्तव आहे. महिलांचे प्रतिनिधित्व निराशाजनक आहे. १७ व्या लोकसभेत ते केवळ १५ टक्के होते. आणि या निवडणुकीतही, तीन टप्प्यांच्या शेवटी, एकूण ४,१७५ उमेदवारांपैकी केवळ ३५८ महिला निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या, हे ८.६ टक्के निंदनीय आहे. महिला सक्षमीकरण-

वास्तविकता होण्यासाठी केवळ नमूद केलेल्या हेतूपेक्षा अधिक आवश्यक आहे. मोदी सरकारचा ऐतिहासिक घटना (१०६ वी सुधारणा) कायदा २०२३, ज्यामध्ये लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये सर्व जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव आहेत, हे येथे अत्यंत परिवर्तनकारी कायदा आहे. महिला राजकारणी आणि कार्यकर्त्यांची अनेक दशकांपासूनची मागणी पूर्ण करून, अंमलबजावणीनंतर भारतीय राजकारणाचे व्याकरण आणि शब्दसंग्रह पुनर्संचयित करण्याचे आश्वासन दिले आहे. काँग्रेस खरे तर ते लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन देते. स्पष्टपणे, सर्व परस्पर वैमनस्य आणि स्पर्धा दरम्यान, एक मूक राजकीय सहमती आहे. महिलांच्या राजकीय सहभागाचे केंद्रस्थान ओळखणारे आणि भारताला एक महान लोकशाही म्हणून ओळखले जाणे आवश्यक का आहे.

(अरून पुरी)


# जाती-अंताच्या चळवळीला जागतिक स्तरावर नेणारे

कर्मवीर -- एकनाथ आवाड जिजा

२५ मे ही कर्मवीर एकनाथराव आवाड - ज्यांना प्रेमाने जिजा म्हटले जाते - ह्यांचा स्मरणदिवस. जिजांना जाऊन आज ९ वर्ष होत आहेत परंतु 'मरावे परी कीर्ती रूपी उरावे' ह्या उक्तीनुसार ते आजही आपल्याला प्रेरणा देत आपल्या सोबत आहेत. मांग जातीच्या पोतराजाच्या एका साधारण कुटुंबात जन्मलेली एक व्यक्ति हलाखीच्या परिस्थितीत शिकून, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अवलंब करून, जाती-अंताची व त्याद्वारे सामाजिक समतेची मशाल लाखों वंचितांच्या हातात देवून जातो हे जितके खरे आहे तितकेच कल्पना करण्यापलिकडलेही आहे!

मला माझ्या अभ्यासाच्या योगाने जिजांनी १९८९ साली स्थापन केलेल्या 'मानवी हक्क अभियान' ह्या संघटनेतील कार्यकर्ते, पदाधिकारी, शेकडो दलित आणि वंचित परिवार ज्यांच्या आयुष्याला जिजारूपी परिसाचा स्पर्श झाला त्यांचासोबत वेळ घालविण्याचा योग आला. मी माझे अनुभव कथन माझे ६ वर्षापासूनचे अमेरिकेतील वास्तव्य, माझ्या जमीन आणि जात ह्या संबंधातील पुस्तकी अभ्यास आणि मराठवाड्यातील क्षेत्र भ्रमण ह्या आधारे केले आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' ह्या लेखाला १५ मे रोजी ८८ वर्षे पूर्ण झाली. जिजांनी प्रत्येक श्वास ह्या लेखात लिहिलेल्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोलाने खर्ची घातला. भारतासारख्या देशात जेथे जातीव्यवस्थेची मुळं शेकडो वर्षापासून घट्ट पाय रोवून आहेत तिथे हे काम वाटतं तेव्हढं सोप्प नाही. ह्या कामाची सहसा लोकांना कल्पना देखील येऊ शकत नाही. ह्या अथक प्रयत्नात कित्येकदा जिजांवर प्राणघातक हल्ले झाले. जिजांना ही जाणीव होती की जातीअंताचा लढा हा कित्येक शतके अर्ध्यपोटी गुलामगिरी करणारा समाज हा उपाशी राहून करणं शक्य नाही. म्हणून गायरान आणि सरकारी जमीन काबीज करण्याच्या मोहीमेचे बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर जिजांनी नेतृत्व करून तिला महत्तप्रयासाने सामाजिक पटलावर महत्त्वाचं स्थान आणलं. प्राथमिक अवलोकनावरून गायरान जमिन काबीज करण्याचा उद्देश हा केवळ त्यावर शेती करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवणे इतका साधा वाटला तरी तो तेव्हढाच मर्यादित नाही. बहुल्य दलित समाज ग्रामीण भागात राहत असल्यामुळे गायरान जमीन काबीज करणे हा जाती-अंताच्या तात्त्विक लढाईचे एक महत्त्वाचे प्रात्यक्षिक आहे. हजारो वर्षापासून जाती-आधारित विभागलेल्या समाजात, दलित आणि इतर वंचित समुदायाने प्रस्थापितांच्या विरुद्ध जावून गावातील शेकडो एकर गायरान जमीन ताब्यात घेणं गरजेचं होतं. त्यासाठी लागणारी हिम्मत व आत्मविश्वास ह्या वंचित समुदायात भरवणं आणि प्रस्थापितांच्या मनात दडपण निर्माण करणं अतिशय महत्त्वाचं होतं. अर्थातच त्यासाठी लागणारी हिम्मत, हुशारी, आणि मुत्सद्दीपणा जिजांकडे पुरेपूर होता किंबहुना त्यांनी तो चळवळीत असतानाच जैविकरित्या (ेसिरपळळलरश्रश्रू) अंगिकारला होता. माझ्या मराठवाडा भ्रमणात मला कित्येक परिवार भेटले की ज्यांचासाठी जमीन अर्धा की पांच एकर आहे, बागायती की कोरडवाहू आहे ह्यापेक्षा स्वतःच्या जमीनीचा तुकडा असण्याचा स्वाभिमान हा बेशकिमती आहे असे वाटते!



प्रस्थापितांकडची लाचारी नाकारून मानाने जगण्याची कला जिजांनी पोटच्या पोरासारखी आम्हाला शिकवली हे जेव्हा कित्येक गावातून कानावर पडतं तेव्हा तुमच्या डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नाही. जिजांच्या भाषणाच्या आठवणी आजही लोकांच्या अंगावर शहारे आणतात. कित्येक लोकांची आयुष्य फक्त जिजांची भाषणं ऐकून बदलली आहेत हे आश्चर्यकारक वाटलं तरी नितांत खरं आहे. जिजांनी आमची मुलं शिकवून कलेक्टर व्हावीत म्हणून झोळी पसरून आमच्याकडे भीक मागितली म्हणून मी माझी मुलं शिकवली असे म्हणणारे कित्येक भेटले. लोकांनी जिजांची भाषणं ऐकून व्यसनं सोडली, बाल-विवाह थांबवले, निवडणुकी लढवल्या, स्वतःची जमीन विकत घेऊन घरं बाधली आणि स्थलांतर थांबवले, असे कित्येक अनुभव मराठवाड्यातल्या कानाकोपर्यातल्या गावची लोकं डोळ्यात पाणी आणून सांगतात तेव्हा जिजांची ही कर्तबगारी ऐकुन गुंगी येते. मग त्यांनी आपल्या घरात गौतम बुद्ध, बाबासाहेब आंबेडकर, सावित्री-जोतिबा फुले, अण्णाभाऊ साठे ह्यांचा रांगेत जिजांना बसवले ह्यात आश्चर्य ते काय?

महाराष्ट्रातील एक लाखाहुन अधिक विविध जाती-धर्माच्या कुटुंबांचे भविष्य मानवी हक्क अभियानाच्या चळवळीतून आमुलाग्र बदलले आहे. अभ्यासपूर्वक आणि जवाबदारीने मी हे मांडू इच्छितो की मानवी हक्क अभियानाची जाती-अंताद्वारे जमीन मिळवून स्वाभिमानाने जगायला शिकवणारी चळवळ ही केवळ महाराष्ट्र, भारत किंवा दक्षिण आशिया खंडातच नाही तर वैश्विक स्तरावरची महत्त्वाची चळवळ आहे. लॅटिन अमेरिकेन खंडातील ब्राजील देशातील चळवळ ही नक्कीच मानवी हक्क अभियानाच्या तोडीची आहे असे म्हणणे अतिशयोक्ति ठरणार नाही! अमेरिकेतील वर्णद्वेषाविरुद्ध लढलेले रोजा पार्क आणि मार्टिन ल्युथर किंग, जु.; ब्लॅक पँथर चे संस्थापक बॉबी सील आणि ह्युी न्यूटन; नॅशनल असोसिएशन फॉर द अडवांसमेंट ऑफ कलर्ड पीपल चे डबलयू. बी. ई. डी बॉय, ठरगवूड मार्शल, रॉय विलकीन्स यांचा इतकेच महत्त्वाचे काम कर्मवीर एकनाथराव आवाड यांनी मानवी हक्क अभियानाच्या वतीने जातीअंतासाठी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत ह्या चळवळीसाठी झोकून दिलेले मानवी हक्क अभियानाचे असंख्य कार्यकर्ते आणि प्रसंगी आपले प्राण पणास लावून गायरान काबीज केलेले लाखों परिवार अभिनंदनास पात्र आहेत. ह्या जागतिक स्वरूपाच्या चळवळीचे नेतृत्व करणारे कर्मवीर एकनाथराव आवाड जिजा हे महाराष्ट्राचेच नाहीत तर भारताचे रत्न आहेत. असे असताना त्यांना आजपर्यंत भारत सरकारचा पद्म पुरस्कार न मिळणे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.

चळवळीत जिजांना त्यांची पत्नी श्रीमती गयाबाई आवाड जिजी यांची लाभलेली साथ ही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी कुटुंब सांभाळतच चळवळीला हातभार लावला आणि राजकारणाच्या माध्यमातून समाजातले प्रश्न तडीस नेले. सूक्ष्म सामाजिक भान, जाणिवेतून निर्माण केलेली कर्तबगारी आणि तरीही कमालीची विनम्र असणारी मुलं सौ. शालन, डॉ. मिलिंद, आणि डॉ. सुरेखा ह्यांच्या जडण-घडणीत जिजांसोबत जिजींचाही कमालीचा वाटा आहे. जिजांपश्चात मानवी हक्क अभियानाच नेतृत्व प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांचासारखा अभ्यासू, कुशल, आणि द्रष्टा व्यक्ति करत आहे हे चित्र सुखावह, ऊर्जादायी आणि आशावादी वाटणारं आहे. वेगाने बदलणाऱ्या समाजव्यवस्थेत सामाजिक चळवळींचे स्वरूप काय असेल आणि ती भूमिका अभ्यासपूर्वक कशी मांडता येईल ह्याचे वैश्विक चिंतन करण्याची क्षमता आणि ते तडीस नेण्याची कार्यनिपुणता प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांच्याकडे आहे ह्याची जगभरातल्या माझ्यासारख्या कित्येक अभ्यासक आणि कार्यकर्त्यांची पूर्ण खात्री आणि विश्वास आहे.

'आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी' असं ब्रीदवाक्य असणाऱ्या मानवी हक्क अभियानाची चळवळ ही जाती-अंताची असली तरी तिचा उद्देश हा असमानतेच्या वृत्तीवर घाव घालणे आहे. असमानता दाखवणाऱ्या जनसमुदायावर हल्ला करणे नाही. हा फरक समजावून घेणं हे अत्यंत महत्त्वाचे आहे - हा फरक कळला नाही तर चळवळीच्या उद्देश जातीचा अंत करण्याऐवजी जाती-अंताला विरोध करणाऱ्यांचा लक्ष्य करणे असा घेऊन चळवळ हिंसक आणि रक्त-रंजीत बनू शकते. मी अशा कित्येक संवेदनशील उच्च-जातीय लोकांना भेटलो ज्यांना जिजांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आणि त्यांच्या चळवळीपददल नितांत आदर आहे किंबहुना ते त्यांचे पुरस्कर्ते आहेत! जिजा आपल्या चळवळीला सहजाचं 'दलित' हक्क अभियान हे नाव देवू शकले असते पण तसं न करता त्यांनी 'मानवी' हक्क अभियान हे शीर्षक देऊन आपली सर्वसमावेशक भूमिकाच समोर आणली आहे. जिजांच नेतृत्व हे केवळ मांग समाजापर्यंत सीमित करण किंवा त्यांना फक्त 'दलितांचा पुढारी' मानण हे सूर्याला काजवा म्हणण्यासारखं आहे. बाबासाहेब आंबेडकरांना 'दलित पुढारी' मानून त्यांच्या व्यासंगाचे रिंगण छोटे करण्याची कुचेष्टा आधीच आपल्या समाजाने केली आहे. ही त्याचीच पुनरावृत्ति म्हणायची. आपण सर्वांनीच जिजांच्या बाबतीत होणारी ही कुचेष्टा प्रयत्नपूर्वक हाणून पाडली पाहिजे व जिजांची 'मानव' असण्याची व्यापक संकल्पना पुढे नेली पाहिजे!

जिजांचं काम हे अमूल्य आहे ह्यात कोणालाही यत्किंचितही शंका नसावी. भाषण करताना 'शाहू-फुले-आंबेडकर' म्हणायची प्रथा महाराष्ट्रात आहे. ह्या तिकडीत कर्मवीर एकनाथराव आवाड यांना बसवण्याची आता वेळ आली आहे. आज जिजांच्या स्मरणदिनाच्या निमित्ताने आपण आपल्या संबोधनात 'शाहू-फुले-आंबेडकर-आवाड' बोलण्याची प्रथा जाणीवपूर्वक सुरू केली पाहिजे. असे केल्याने शाहू, फुले आणि आंबेडकर हे आपल्याला परलोकी योग्य साथीदार मिळाला असं वाटून आनंदून गेल्याशिवाय राहणार नाहीत...!

विशाल जामकर (मोबा: ७७३८१ ९५७८५) हे यूनिवर्सिटी ऑफ मिंनेसोटा, अमेरिका येथे जमीन आणि जात ह्या संबंधावर पीएचडी करत आहेत. ते चार महिन्यापासून माजलगाव, बीड येथे मुक्कामाला असून आपल्या अभ्यास दौऱ्यात मराठवाड्यातील मानवी हक्क अभियानाशी संबंधित परिवार आणि कार्यकर्ते तसेच स्थानिक राजकारणी आणि अधिकारी यांच्याशी वार्तालाप करत आहेत...

# जीवाचीवाडीत साठवण तलावामध्ये नितीन काळे यांचा पाण्यात बुडून मृत्यू

केज (प्रतिनिधी):- केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे साठवण तलावामध्ये मासे पकडण्यासाठी गेलेल्या दारूच्या नशेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दिनांक :२३/०५/२०२४ रोजी घडली.

मृतदेह सापडण्यासाठी परळी येथील शोध कार्य पथकास पाचारण केले असता ते रात्री उशिरा जीवाचीवाडी येथे पोहोचले व उशीर झाल्यामुळे ते याच ठिकाणी जीवाचीवाडी येथे थांबले आणि सकाळी सहा वाजता मृतदेह सापडण्यासाठी त्यांनी त्यांची शोधमोहीम सुरू केली बराच कालावधीनंतर दुपारी बाराच्या आसपास म्हणजे,२४/०५/२०२४ रोजी शुक्रवार या दिवशी मृतदेह सापडण्यात त्यांना यश आले.




नितीन मच्छिंद्र काळे वय ३४ वर्षे राहणार पुणे येथे व काही दिवसापूर्वी ते जीवाचीवाडी तालुका केज जिल्हा बीड त्यांच्या मूळ गावी आले असता, मित्राच्या सोबत जीवाचीवाडी येथील साठवण तलावामध्ये मासे पकडण्यासाठी गेले असताना त्यांना पोहता येत होते मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने व माशाच्या जाळीत अडकल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे.

# नाथपंथी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द -डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये श्री गुरु गोरक्षनाथ अनुग्रह दिन व सामुहिक नाथ दिक्षा कार्यक्रम

बीड (प्रतिनिधी)

नाथपंथी समाज हा अत्यंत शिस्तप्रिय समाज आहे. समाजातील तरुण आता शिक्षण क्षेत्रात प्रगती करू लागले आहेत. समाजातील तरुणांना योग्य दिशा दाखवण्याचे काम ज्येष्ठांनी केले पाहिजे. प्रभू गोरक्षनाथांच्या आशिर्वादाने आपण समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून प्रत्येक अडीअडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ, नाथमुद्रा प्रतिष्ठान व नाथमुद्रा बचत गट, बीडच्यावतीने श्री गुरु गोरक्षनाथ अनुग्रह दिन व सामुहिक नाथ दिक्षा कार्यक्रमाचे गुरुवारी (दि.२३) आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.




विशेष अतिथी म्हणून अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबईचे नगरसेवक डॉ.जयाजी नाथ, डॉ. के.बी. पैठणकर, महासंघाचे सचिव व्ही.बी. नाथ, मराठवाडा अध्यक्ष सोमनाथ धायडे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी नगर जिल्हाध्यक्ष कांचन धायडे, लातूर अध्यक्ष दत्ता सूर्यवंशी, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष संतोष चव्हाण, नगरचे जिल्हाध्यक्ष राहुल कासार, बीडचे जिल्हाध्यक्ष भरतनाना चव्हाण, परळीचे भरत महाराज जोगी, प्रा.बालकनाथ यादव यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभागृहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील

शहरात समाजासाठी सामाजिक सभागृह उभारावे अशी मागणी नाथपंथी समाजातून करण्यात आली. या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरात जागा उपलब्ध करू देऊ. त्यानंतर सभागृहाचा प्रश्न मार्गी लावू, अशी ग्वाही दिली आहे.नाथपंथी समाजाचे संघटन करणार

राज्यभरातील नाथपंथी समाजाचे संघटन करणार असल्याचे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबईचे नगरसेवक डॉ.जयाजी नाथ यांनी म्हटले. समाजाच्या विविध प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे त्यांनी म्हटले.

# बुद्ध जयंती निमित्त मी रमाई या चित्रपट प्रदर्शन व व्याख्यान नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी ।प्रतिनीधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर मित्र मंडळा परळी वै वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त एकपात्री संकल्पना निर्मित मी रमाई या विषयावर चित्रपट प्रदर्शन व व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाची सुरुवात सुगंध कोटी बोधकथा गल्ली येथील बौद्ध विहार या ठिकाणी तथागत महात्मा गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.हा कार्यक्रम सुगंध कुटी बुद्ध विहार समोरील प्रांगणात घेण्यात आला, कार्यक्रमाचे उद्घाटक तथा स्वागत अध्यक्ष प्रा. बालाजी जगतकर संपादक बीड अक्षरधाम हे उपस्थित होते तर मी रमाई यांची भूमिका करणाऱ्या सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे, चित्रपट दिग्दर्शक प्रकाश वाघ,यांची प्रमुख उपस्थिती होती, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, मार्गदर्शन बालासाहेब जगतकर, नितीन रोडे, सोपान ताटे, अँड.दिलीप उजगरे, अनिल मस्के, भैय्यासाहेब आदोडे, प्रताप समिंदरसवळे, राज जगतकर, धम्मा आवचारे, अभिजित कांबळे,या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक जतिन जगतकर व भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर मित्र मंडळ हे उपस्थित होते.

मी रमाई बोलते या चित्रपटाचे प्रदर्शन व व्याख्यान कार्यक्रमास सुरुवातीला सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला, त्यानंतर प्रस्ताविक सोपान ताटे यांनी केले तर मी रमाई च्या अभिनेत्री यांनी या चित्रपट निर्मिती बद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी रमाईचा त्याग व कणखर रमाई, शिक्षित रमाई, भाषण देणारी रमाई, रडणारी नाही तर लढवय्या रमाई जगासमोर मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून केला आहे अशी माहिती सांगितली, चित्रपट निर्मितीचा मोठा खर्च असून तो समाज



बांधवांनी उचलावा अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी बोलताना इच्छा व्यक्त केली. गावा गावात जाऊन या चित्रपटाबद्दल त्या रमाईच खरं रूप व इतिहास सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. या कार्यक्रमाला भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर या ठिकाणच्या नागरिकांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दर्शवला, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक जतिन जगतकर यांनी मोलाचे परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद तूपसमरे यांनी केले तर आभार व समारोप सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी मानले. मी रामाई चित्रपट व व्याख्यान कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल जतिन जगतकर व त्यांच्या मित्र मंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.




# तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त मौजे शिवनी येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

नाळवंडी । प्रतिनिधी

विश्वाला,शांतीचा,करुणेचा,मैत्रीचा,संदेश देणारे महाकारूनिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंती निम्मित मौजे शिवणी येथे आयोजित प्रियदर्शी धम्मसंस्कार संस्था बीड च्या वतीने प्रियदर्शी धम्मसंस्कार संस्थेचे सचिव भिख्खू धम्मशीलथेरो यांच्या नेतृत्वाखाली या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,या रक्तदान शिबिरामध्ये तब्बल ५० पेक्षा अधिक रक्तदात्याने आपले रक्तदान केले,या वेळी जीवनदायी ब्लड बँक बीड च्या सह्यतेने हा कॅम्प राबवण्यात आला होता,,आपल्या रक्ताने कुणाचा तरी जीव वाचू शकतो,रक्त दान हेच सर्वात श्रेष्ठ दान आहे,अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते.अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही, त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.त्यामुळे या शिबिरामधील रक्तदात्यांचे आयोजकाकडून व तसेच जीवनदायी ब्लड सेंटर कडून आभार व्यक्त करण्यात आले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT